# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.


दिनांक 25/05/2020 (सोमवार)
(दुपार)

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. कन्हान :–अंतर्गत 10 कि.मी. डुमरी शिवार येथे दिनांक 24/05/2020 चे 05:00 वा. दरम्यान एमएच–40/बीएल– 6498 क्रमांकाचा टाटाचा चालक आरोपी नामे– आकाश सुधाकर देशमुख(मृतक), वय 23 वर्ष, रा. राधा कृष्ण वार्ड, रामटेक याने त्याच्या ताब्यातील वाहनात भाजी पाला लोड करून वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने घटना स्थळावरील लावलेले बॅरीकेट दिसून न आल्याने वाहन उलटले. या अपघातात आरोपी हा गंभीर जखमी झाला. त्यास उपचाराकामी मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे नेले असता त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– शालीक अशोक देशमुख, वय 33 वर्ष, रा. राधा कृष्णा वार्ड रामटेक यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रविन्द्र हे करीत आहे.

### निष्काळजीपणामुळे मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– अंतर्गत फिलींग प्रोससींग हाउस, बिल्डींग न डी 5 इकॉनॉमीक्स कंपनी, सावंगा डुमरी शिवार येथे दिनांक 23/05/2020 चे 17:00 वा. दरम्यान प्रितेश जैतगुडे(मृतक) वय 20 वर्ष, ह.मु. सावंगा मुळ रा. रामटेक तालुका व जखमी 1) दत्तु बागडे, वय 51 वर्ष, रा. शिवा 2) भुषण डेवारे, वय 23 वर्ष, रा. शिवा, 3) मुकेश धुर्वे, वय 21 वर्ष, रा. शिवा, 4) निलेश उईके, वय 26 वर्ष, रा. मुरली व 5) भुषण पुंड, वय 23 वर्ष, रा. बाजारगाव हे सर्व कामगार हे स्फोटक पदार्थाबाबत काम करीत असतांना सदरच्या कामाच्या ठिकाणचे आरोपी नामे क्र. 1) नितीन राठी(बिल्डींग इंचार्ज) आणि 2) विश्वास वानखेडे (सुपरवायझर) फिलींग प्रोसेसिंग हाउस, बिल्डींग नं डी 5, इकॉनॉमीक्स कं. सावंगा यांनी सदर कामगाराच्या सुरक्षीततेची काळजी न घेता त्यांच्या निष्काळजीपणामुळे, कामगारांचे जीवीत धोक्यात आणणारी कृती केल्यामुळे प्रितेश जैतगुडे हा मृत होण्यास तसेच दत्तु बागडे आणि भुषण डेवारे हे गंभीर जखमी होण्यास तसेच मुकेश धुर्वे, निलेश उईके, भुषण पुंड हे जखमी होण्यास आरोपी कारणीभुत झाले.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक किशोर लोही यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कोंढाळी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 283, 337, 338, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री श्याम गव्हाणे 9923756383 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर